# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
## सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालय
## "लेखा कोष भवन" जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१
## जाहिरात क्र. १/२०२४

महाराष्ट्र शासनाच्या सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर या प्रादेशिक विभागांतर्गत सहसंचालक कार्यालय, नागपूर, कोषागार कार्यालय, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर कार्यालयातील **कनिष्ठ लेखापाल (गट-क) (वेतनस्तर एस-१०-२९२००-९२३०० या वेतनश्रेणीत)** या संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व | सा.शै.मा.प्र | आ.दु.घ | अराखीव(खुला) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ६ | ३ | २ | २ | १ | २ | २ | ७ | ६ | ६ | १९ | ५६ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणांचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २ | १ | १ | १ | १ | १ | १ | २ | २ | २ | ६ | २० |
| महिला | २ | १ | १ | १ | ० | १ | १ | २ | २ | २ | ५ | १८ |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| माजी सैनिक | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ३ | ८ |
| अनाथ | १ (संस्थात्मक प्रवर्गाकरिता) | | | | | | | | | | | |
| दिव्यांग | २ पदे | | | | | | | | | | | |
| | (a) | १- अंध/अल्पदृष्टी (B-Blind/(LV-Low Vision), | | | | | | | | | | |
| | (b) | १- कर्णबधिरता अथवा ऐकू येण्याकरिता दुर्बलता (D-Deaf, HH-Hard of Hearing), | | | | | | | | | | |
| पदवीधर अंशकालीन | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | २ | ५ |
| भूकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | २ |

टीप : १) भरावयाच्या उपरोक्त संवर्ग/पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणात तसेच वर नमूद केलेल्या पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

२) वरील राखीव/बिनाराखीव पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. समांतर आरक्षणाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच प्रवर्गातील अन्य पात्र उमेदवारांची निवड करून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

३) उपरोक्त पदांपैकी काही पदे ही शासन नियमानुसार अनाथासाठी व दिव्यांगासाठी आरक्षित असून सदर पदे सामाजिक आरक्षणाचा विचार न करता गुणवत्ता क्रमांकानुसार भरली जातील.

सदर जाहिरात सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग अधिनियम दिनांक २६.०२.२०२४ व संबंधित शासन निर्णय दिनांक २७.०२.२०२४ संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्र. ३४६८/२०२४ व इतर अन्वये दाखल झालेल्या न्यायिक प्रकरणातील मा. न्यायालयाच्या अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहून प्रसिद्ध करण्यात येत आहे. या जाहिराती संबंधित शिफारसी व नियुक्त्या उक्त उल्लेखित न्यायिक प्रकरणातील अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येतील.

**वेळापत्रक**

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी | दि. १०.०१.२०२५ रोजी १७.०० वाजल्यापासून<br>दि. ०९.०२.२०२५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत. |
| २. | ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दि. ०९.०१.२०२५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत. |
| ३. | प्रवेशपत्र ऑनलाईन प्रिंट काढून घेणे | याबाबत संकेतस्थळावर सूचना प्रसिद्ध करण्यात येईल. |
| ४. | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | याबाबत संकेतस्थळावर सूचना प्रसिद्ध करण्यात येईल. |

१) आवश्यकतेनुसार वरील वेळापत्रकात बदल झाल्यास त्याबाबत वेळोवेळी https://mahakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सूचना प्रसिद्ध करण्यात येतील. अशा सूचननांचे वेळोवेळी अवलोकन करण्याची उमेदवारांनी दक्षता घ्यावयाची आहे.

२) उमेदवारांच्या संख्येस अनुसरून आवश्यकतेनुसार वेगवेगळ्या सत्रांमध्ये परीक्षा घेण्यात येतील.

**सेवाप्रवेश नियमानुसार किमान आवश्यक असलेली शैक्षणिक व तांत्रिक अर्हता**

| अ.क्र. | पद | किमान शैक्षणिक व तांत्रिक अर्हता |
|---|---|---|
| १. | **कनिष्ठ लेखापाल** | **(१) शैक्षणिक अर्हता** - सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी **(२) तांत्रिक अर्हता** - मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनीट किंवा इंग्रजी टंकलेखनाचे ४० शब्द प्रति मिनीट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र. |

वयोमर्यादा-१९ वर्षापेक्षा कमी नसावे, खुल्या वर्गातील व्यक्तीसाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय व्यक्तीसाठी ४३ वर्षे, दिव्यांग व अनाथ व्यक्तीसाठी वयोमर्यादा ४५ वर्षांपर्यंत शिथिलतम राहील. मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग आणि खेळाडू यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची सवलत यापैकी कोणतीही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील.

- **परीक्षा शुल्क** | **अराखीव (खुला) प्रवर्ग - १०००/-** | **राखीव प्रवर्ग - ९००/-** | **माजी सैनिक यांचेसाठी परीक्षा शुल्क माफ राहील**

प्रस्तुत जाहिरात ही परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त जाहिरात असून अर्ज स्वीकारण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, परीक्षेचे स्वरूप, परीक्षा शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया याबाबतचा सविस्तर तपशील दिनांक १०.०१.२०२५ रोजी https://mahakosh.maharashtra.gov.in सर्वसाधारण सूचना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याचे कृपया अवलोकन करावे. भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम कार्यक्रमातील बदल, सूचना वगैरे https://mahakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करून घेण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे. परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर यांना राहतील व या संदर्भातील त्यांचा निर्णय अंतिम राहील. याबाबत कोणासही कोणताही दावा करता येणार नाही.

सही/-
**(गजानन भा. हिरुळकर)**
**सदस्य सचिव, प्रादेशिक निवड समिती, नागपूर तथा**
**सहायक संचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर**

सही/-
**(ज्योती तु. भोंडे)**
**अध्यक्ष, प्रादेशिक निवड समिती, नागपूर तथा**
**संचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर**

**DGIPR-2024-25/NO-5/C5465**